सुधारणा व पुनर्वसन

महाराष्ट्र शासन, गृह विभाग

फोन क्र. : (०२०) २६१२३५६३
फॅक्स क्र. : (०२०) २६१२५८७८
Email ID : igoffice.est1-mh@gov.in
Website : www.mahaprisons.gov.in

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,
पुणे ४११ ००१

जाक्र.इएसटी/लिपिक व लिपिक रिक्त पदेभरती/२०२३-२४/ 5514 /कक्ष १(३) पुणे दिनांक १७.६.२०२५

## // उमेदवारांना सूचना//

**विषय :-** कारागृह विभागाचे संकेतस्थळावर प्रसिध्द झालेल्या प्रतिक्षा यादीतील निवड करण्यात उमेदवारांचे दस्तऐवज पडताळणीबाबत.

कारागृह विभाग सरळसेवा लिपिक - वरिष्ट लिपिक पदभरती-२०२३-२४ अंतर्गत दिनांक १९.३.२०२४ ते २१.३.२०२४ या कालावधीत घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेत प्राप्त गुणांनुक्रमानुसार सामाजिक व समांतर आरक्षण तसेच समान गुण मिळालेल्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी विचारात घेवून **लिपिक एकुण १२५ व वरिष्ठ लिपिक एकुण ३१** पदांची प्रवर्गनिहाय निवडसूची कारागृह विभागाचे संकेतस्थळावर (www.mahaprisons.gov.in) प्रसिध्द करण्यात आली होती त्यानुसार सदर उमेदवारांची मुळ कागदपत्र तपासणी करण्यात आली मात्र त्यापैकी जे उमेदवार गैरहजर होते व जे मुळ कागदपत्र तपासणीमध्ये अपात्र आले आहेत व जे उमेदवार येण्यास इच्छुक नाहीत त्यांची निवड रद्द करण्यात आली असून त्याऐवजी प्रतिक्षायादीतील व गुणवत्तायादीतील उमेदवारांची प्रवर्गनिहाय निवड मुळ दस्तऐवज पडताळणी, वैद्यकिय तपासणी व पूर्वचारित्र्य पडताळणीचे अधीन राहून करण्यात आली आहे. त्याची यादी सोबत जोडण्यात आली आहे.

कारागृह विभागाचे लिपिक व वरिष्ठ लिपिक पदाचे निवडयादीत नमुद असलेल्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात अपलोड केलेले दस्तऐवज जसे शैक्षणिक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, समांतर आरक्षण संबंधी पूरावा व इतर सर्व दस्तऐवज यांची मुळ कागदपत्रे व त्यांच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रतीसह स्वत: (प्रतिनिधी चालनार नाही) दस्तऐवज पडताळणीकरिता खालील नमुद ठिकाणी व वेळी समक्ष उपस्थित रहावे.

| संवर्ग | उमेदवार संख्या | दस्तऐवज पडताळणी दिनांक व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| वरिष्ठ लिपिक | क्र १ ते १२ | दि. १८.६.२०२५ सकाळी १०.३० वाजता | अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय, जूनी मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१ |
| लिपिक | क्र १ ते २६ | | |

मुळ दस्तऐवज तपासणीकरिता विहित प्रपत्र सोबत जोडण्यात आलेले आहे. सदर प्रपत्रातील सर्व माहिती अचूकपणे नमुद करण्यात यावी. व त्यासोबत नमुद केलेली सर्व मुळ कागदपत्रे व स्वसाक्षांकित प्रतीसह सोबत आणावयाची आहेत.

उमेदवाराने आरक्षित जागेकरिता अर्ज केला असल्यास त्या पुष्ठयर्थ आवश्यक असलेली मुळ प्रमाणपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच दस्तऐवज पडताळणीचे वेळी उमेदवाराने स्वत:च्या

ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेला पुरावा, स्वतःचे आधारकार्ड व त्याची स्वसाक्षांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

उमेदवार विहीत शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा दस्तऐवज पडताळणीकरीता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास उमेदवारास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

तसेच उपरोक्त नमुद दिवशी दस्तऐवज पडताळणीकरिता उपस्थित न राहिल्यास उमेदवारास नियुक्तीची आवश्यकता नाही असे गृहीत धरून निवड रद्द केली जाईल व तद्नंतर या संदर्भात होणाऱ्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

दस्तऐवज पडताळणीकरिता उमेदवाराने स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे असून दस्तऐवज पडताळणी प्रक्रियेबाबत मा अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचा निर्णय अंतिम राहील व तो सर्व उमेदवारांवर बंधनकारक राहील.

**(मा अ पो मं स व कामनि यांचे मान्यतेने)**

(सत्यवान हिंगमिरे)
**वरिष्ठ प्रशासन अधिकारी**
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे -०१